/

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस **P.S.(ठाणे):** विरार **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0665 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/08/2021 21:06 वाजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 03/08/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/08/2021

**Time From (वेळेपासून):** 13:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/08/2021 **Time (वेळ):** 20:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 045 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/08/2021 20:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.50 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वसई विरार शहर महानगरपालिका,विरार पुर्व, तिसरा मजला, तावरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रविंद्र घनश्याम घरत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | हनुमान मंदीर रोड, घरत कम्प्ले,पोकामन, तावसई, जिपालघर,मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | हनुमान मंदीर रोड, घरत कम्प्ले,पोकामन, तावसई, जिपालघर,मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शशिकांत मुकूंद किणी | | | 1. नगररचना विभाग, वसई विरार,शहर महानगरपालिका तावसई,मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 8,000/ रुपये रोख रक्कम | 8,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 8,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक: 03/08/2021 मी रविंद्र घनश्याम घरत, वय- 35 वर्षे , धंदा- इस्टेट एजंट,रा. हनुमान मंदीर रोड, घरत कम्प्लेक्स, पो.कामन, ता.वसई, जि.पालघर मोबाईल क्र. 9270006070 असा असून समक्ष फिर्याद लिहून देतो की, मी वरील प्रमाणे असून माझे घरातून इस्टेट एजंट चा व्यवसाय करतो मी वसई विरार परिसरात शेतजमिन तसेच रूम खरेदी विक्रीचे व्यवहार करतो. माझे ओळखीचे श्री संजय रमेशचंद्र मेहता, रा.एल.टि.रोड, बोरीवली यांना बिगरशेती जमीन खरेदी करावयाची असल्याने त्यांनी माझेशी सुमारे 1 वर्षापूर्वी संपर्क साधलेला होता. त्यावेळी मी त्यांना आमचे गावचे रहिवाशी असलेले श्री.विजय भास्कर धुमाळ यांची मौजे कामण येथील सव्हे न.160/1 पैकी 30 गुंठे बिगरशेती जमीन दाखविली होती. सदरची जमीन त्यांना पसंद पडल्याने त्यांनी ती सुमारे 8 महिन्यापूर्वी खरेदी केलेली होती. व त्यानतर सदरच्या जमिनीचे सातबारा काढणे, जमीन सातबारा नावे करणे, भूमी अभिलेख कार्यालयातील सदर जमीनी संबधातील कामे करणे करीता श्री.सजय मेहता व इतर यांनी मला त्यांच्या भारत ग्राम उदयोग या कंपनीच्या लेटर पडवर लेखी संमतीपत्र लिहून दिलेले आहे. त्यानंतर मी सदर जमिनीच्या अनुषंगाने सातबारा फेरफार करणे वगैरे कामे पूर्ण केलेली आहेत. मौजे कामण येथील सर्व्हे नं.160/1 मधील श्री.सजय मेहता व इतर यानी खरेदी केलेल्या 30 गुंठे जमिनीचा पोट हिस्सा करणेकामी अर्जदार श्री.संजय मेहता यांनी केलेला अर्ज घेवून मी दिनांक 18/06/2021 रोजी भूमीअभिलेख कार्यालय, वसई येथे गेलो होतो. त्यावेळी तेथील कर्मचारी यांनी मला सदरची जमिन वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील असल्याने वसई विरार शहर महानगरपालिकेकडून नाहरकत दाखला घेवून येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी अर्जदार श्री.सजय मेहता याचा दिनाक 05/07/2021 रोजी अर्ज घेवून वसई विरार शहर महानगरपालिका विरार पूर्व येथे दिला होता. त्याची पोहोच घेतलेली आहे. सदर ठिकाणी मी नाहरकत दाखल्याबाबत विचारणा केली असता सदरचा दाखला हा नगररचना विभागात दिला जात असल्याबाबत मला माहिती मिळाली. त्यानंतर मी सदर नाहरकत दाखल्याचे अनुषंगाने वसई विरार महानगरपालिका विरार पूर्व येथील नगररचना विभागातील श्री.किणी याना भेटलो असता त्यांनी मला सदरचा दाखला घेण्याकरीता 10 दिवसानंतर भेटण्यास सांगीतले. त्यानतर मी सुमारे 10 ते 15 दिवसांनी श्री.किणी याना जावून भेटलो असता त्यावेळी त्यांनी मला पुन्हा 10 दिवसांनी येण्यास सांगीतले. त्यानतर मी सुमारे 8 ते 10 दिवसापूर्वी मी व माझे मित्र श्री.मनोहर गुप्ता असे वसई विरार महानगरपालिका, विरार पूर्व येथे जावून नगररचना विभागातील श्री.किणी यांना भेटलो असता त्यांनी मला नमूद नाहरकत दाखला देण्यासाठी शासकिय फी 2000/- रूपये व त्यांच्या स्वतःकरीता 10,000/- रूपये दयावे लागतील असे सांगीतले. परंतु मला सदरची लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी श्री.किणी साहेब यांना सदरची लाचेची रक्कम देण्यास



Scanned with CamScanner

नकार दिला. त्यानंतर लोकसेवक श्री.किणी यांनी माझे मित्र श्री.मनोहर गुप्ता यांचेमार्फतीने 10,000/- रूपये लाचेची रक्कम देण्याकरीता मला वारंवार निरोप पाठवित होते. परंतु मला श्री.शशिकांत किणी यांना शासकिय फी व्यतिरिक्त उर्वरीत लाचेची 10,000/- रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने मी दिनांक 02/08/2021 रोजी ऍन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कम्प पालघर कार्यालयात जावून वसई विरार महानगरपालिका, विरार पूर्व येथे जावून नगररचना विभागातील श्री.शशिकांत किणी यांचेविरूध्द लेखी तक्रार दिली आहे. माझे सदर तक्रारीचे अनुषंगाने पुढील कारवाई करणेकामी ऍन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कम्प पालघर कार्यालयाचे पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी दिनांक 02/08/2021 रोजी जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालयात, पालघर येथे पत्र देवून दोन पंच साक्षीदार मागवून घेतले. सदर पंचाना माझी तक्रार वाचण्यास दिली व माझे कामाचे अनुषंगाने लोकसेवक श्री.शशिकांत किणी हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पंचासमक्ष दिनांक 03/08/2021 रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर दिनांक 03/08/2021 रोजी पंच व पडताळणी पथक विरार येथे येवून पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे माझे अंगावर व्हईस रेकर्डर लावून पंच नं.01 श्री.अधिकारी यांचेसह वसई विरार शहर मनपा येथे जावून नगररचना विभागातील लोकसेवक श्री.शशिकांत किणी यांना भेटून कामाच्या अनुषंगाने बोलणी करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी पंच नं.01 यांचेसह वसई विरार शहर मनपा येथे जावून नगररचना विभागातील लोकसेवक श्री.शशिकांत किणी यांची भेट घेवून माझे कामाचे अनुषंगाने त्यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी मला थोडया वेळ थांबण्यास सांगीतले. त्यानंतर लोकसेवक श्री.किणी यांनी माझी एका रजिस्टरवर सही घेतली. त्यानंतर त्यांनी मला 1000/- रूपयाच्या दोन पावत्या मला दिल्या. त्यावेळी सदर पावतीची फी 2000/-रूपये हे लोकसेवक श्री.किणी यांना दिले असता लोकसेवक श्री.किणी यांनी सर्व एकत्रच दया ना... त्यावेळी मी त्यांना किती झाले असे विचारले असता लोकसेवक श्री.किणी यांनी मला सर्व मिळून दहा सांगितलेले ना... त्यावेळी मी त्यांना मला काय बोलले नाहीत ते काल... त्यावेळी लोकसेवक श्री.किणी हे ते नाय नाय काकांना सांगितलेल होत ना मी असे बोलले.... त्यावेळी मी त्यांना पुन्हा आजचा काय विषयच झाला नाय मी त्यांना फोन करतो अकाउंट ला ट्रान्सफर करायला सांगतो. एटिएम ला जावून येतो असे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक श्री.किणी हे मला पावतीचे आठ... असे दहा टोटल ... पावातीचे दोन... असे आठ असे बोलले.... अशा प्रकारे लोकसेवक श्री.किणी यांनी माझेकडे 8,000/-रूपयाची लाचेची मागणी केली. त्यानंतर मी लोकसेवक श्री.किणी यांना येतो असे सांगून सदर ठिकाणाहून निघून मी व पंच नं.01 श्री.अधिकारी असे पडताळणी पथकाजवळ आलो. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी सदर डिजीटल व्हईस रेकर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले असता सदर संभाषणामध्ये लोकसेवक श्री.शशिकांत किणी यांनी पडताळणी कारवाई दरम्यान माझेकडे शासकिय फी चे 2000/-रूपये देण्यास सांगून सदर 2000/-रक्कमेच्या प्रत्येकी 1000/- दराच्या दोन पावत्या दिलेल्या असून लोकसेवक किणी यांनी स्वतः करीता 8000/-रूपयाची लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करून सदरची लाचेची रक्कम तात्काळ घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा कारवाई तात्काळ करणे आवश्यक असल्याने लागचीच सापळापूर्व पंचनाम्याची कायदेशिर पूर्तता करून पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांचे सुचनेप्रमाणे माझे अंगावर व्हईस रेकर्डर लावून तसेच ऍ‍ंथ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या 8000/- रूपये रक्कमेसह पंच नं. 01 श्री.अधिकारी यांचेसोबत वसई विरार शहर मनपा विरार पूर्व येथील नगररचना विभागातील लोकसेवक श्री.शशिकांत किणी यांचे कार्यालयात गेलो. त्याचवेळी माझे पाठोपाठ ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाचे सापळा पथक लोकसेवक श्री.किणी यांचे कार्यालयाचे बाहेर कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबले. त्यानंतर मी श्री.किणी यांचे नगररचना विभागाचे कार्यालयात जावून त्यांची भेट घेवून लोकसेवक श्री.किणी यांना साहेब तुम्ही सांगितलेले आठ हजार आणलेत असे सांगीतले... त्यावेळी लोकसेवक श्री.किणी हे हां... हां... असे सागून माझे कामाचे अनुषंगाने माझेशी बोलणी करू लागले.त्यावेळी मी त्यांना काय कमी जास्त सर... असे विचारले असता लोकसेवक श्री. किणी हे मला त्यावेळी मी बोललो नाय का त्या दिवशी..... डबल फी होते तुमची असे सांगीतले... त्यानंतर मी लोकसेवक श्री.किणी यांना 8000/- रूपये लाचेची रक्कम दिली असता लोकसेवक श्री.किणी यांनी माझेकडून 8000/- रूपये लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारली व त्यांचे डावे हाताने ती त्यांचे डावे बाजूकडील टेबलाचे खणामध्ये ठेवून दिली. त्यांनतर सदर लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी लोकसेवक श्री.किणी यांचे कार्यालयाचे बाहेर येवून सापळा पथकास पुर्वनियोजीत ईशारा केला असता, सापळा पथकाने श्री.किणी यांना नगररचना विभाग, तिसरा मजला, वसई विरार शहर मनपा कार्यालयात, विरार पूर्व येथे लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. तसा सविस्तर पडताळणी, सापळा पूर्व व सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे. तरी लोकसेवक श्री.शशिकांत मुकुंद किणी, वय -54 वर्षे, लिपिक, नगररचना विभाग, वसई विरार शहर महानगरपालिका ता.वसई, जि.पालघर राहणार रूम नं.302, आर्य हेरीटेज, चाणक्य नगरी, नालासोपारा पश्चिम, ता.वसई, जि.पालघर यांनी माझेकडील खरेदीदार श्री.संजय रमेशचंद्र मेहता यांनी मौजे कामण येथे खरेदी केलेल्या जमिनीचा पोटहिस्सा वेगळा करून घेण्यासाठी नाहकरत दाखला मिळणेकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागात अर्ज केलेला असताना सदर अर्जाचा पाठपुरावा श्री.संजय मेहता यांचे संमतीपत्राप्रमाणे मी करीत असताना नाहरकत दाखला देणेकरीता 10,000/-रूपयाची लाचेची मागणी केली. तसेच दिनांक 03/07/2021 रोजी ऍन्टी करप्शन ब्युरो, पालघर कार्यालयाकडून करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान 8000/-रूपयाची लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करून सदर लाचेची रक्कम आज दिनांक 03/08/2021 रोजी 13.05 वाजताचे सुमारास नगररचना विभाग, वसई विरार शहर महानगरपालिका विरार पुर्व, तिसरा मजला, ता.वसई, जि.पालघर येथे स्विकारली असताना ऍन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कम्प पालघर) या कार्यालयाचे सापळा पथकाने रंगेहात पकडले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे. सदरची फिर्याद ही मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष ही फिर्याद लिहून दिली. ( रविंद्र घनश्याम घरत) तपासिक अंमलदार :- पोलीस उप अधिक्षक/ श्री. नवनाथ जगताप, अँटी करप्शन ब्युरो ठाणे( कॅम्प पालघर)मोनं-9850158810



Scanned with CamScanner

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Suresh Haribhau Varade(I (Inspector)) / PNMAH **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Suresh Haribhau Varade
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH

PSI
पोलीस ठाणे अंमलदार,
विरार पोलीस ठाणे,
पि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner